# हेरीटेज कल्चर आर्ट अंड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी

संस्थेची स्थापना :- २६ जुलै १९९४ कार्यक्षेत्र – महाराष्ट्र राज्य

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी ऑफ रत्नागिरी ही संस्था सन १९९४ पासून रत्नागिरी जिल्ह्यात महिला, बाल, युवक-युवती यांच्यासाठी शिक्षण, आरोग्य , सबलीकरण-सक्षमीकरण, निरंतर जीवनाधार (उपजीविका), लिंगसमभाव, पर्यावरण या विषयावर काम करीत आहे. हेरीटेजला आम्ही नागरी समाज संघटन मानतो . त्यामुळे हेरीटेज संस्थेने वंचित, मागे राहिलेल्या व दुर्लक्षिलेल्या समूहाला हक्क व अधिकाराची जाणीव करून देऊन त्यांना मुख्य प्रवाहात सामील करण्याचे काम प्रामुख्याने केले . आणि करीत आहे .

संस्थेचे हे २७ वे वर्ष आहे. या काळात हे संघटन लांजा, रत्नागिरी व राजापूर तालुक्यात समुदाय संघटन, जाणीव जागृती , प्रबोधन व विकास या त्रिसुत्रीवर आधारीत स्वैच्छीक काम करीत आहे .

हेरीटेज संस्था, जावडे, ता.लांजा, जि.रत्नागिरी येथे न्यू इंग्लिश स्कूल जावडे ही माध्यमिक शाळा गेली २३ वर्षे चालवीत आहे. या शाळेतून आत्तापर्यंत साडे सातशेहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेऊन गेले आहेत . शाळेचा दहावीचा निकाल १०० टक्के लागतो .

सन २०१८ पासून संस्थेने भटक्या जमाती व विमुक्त जातींकरिता प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा जावडे, ता.लांजा या निवासी शाळा सुरु केल्या आहेत . गेली २७ वर्षे हेरीटेज संस्था धर्मादाय स्वरूपाचे काम करीत आहे. संस्थेशी संबंधित व्यक्ती पाणी व स्वच्छता, समाज व्यवस्थापन , पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन क्षमता बांधणी व जनजागृती , सार्वजनिक आरोग्य व स्त्री –पुरुष समानता या क्षेत्रात १० ते २७ वर्षे काम करीत आहे .

**संस्थेचे व्हीजन :-** समानता , माणुसकी , नैतिकता , समान न्याय व समान संधी या नीतीमुल्यांवर आधारीत हिंसामुक्त व शांतताप्रिय समाजाची निर्मिती

**संस्थेचे मिशन ;-** हेरीटेज संस्था समाजातील बाल , युवा-युवती व महिलांना हक्क व अधिकारांची जाणीव करून संघटन, प्रबोधन विकास यातून सबलीकरण व सक्षमीकरण करून त्यांना दर्जेदार शिक्षण देऊन लिंगभेद नाहीसे करून त्यांच्या आरोग्याला पोषक होईल अशा पर्यावरणाचे संवर्धन करून कायमस्वरूपाचे उपजीविकेचे साधन निर्माण करून त्यांना आत्मनिर्भर व स्वयंपुर्ण करणार

## संस्थेची प्राथमिक माहिती :-

- कायदेशीर दर्जा :- १. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी क्र. :- एफ – १४६२ , रत्नागिरी , दि.२९/१२/१९९४
  २. संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी क्र.:- महाराष्ट्र/ १४७२ /रत्नागिरी , दि.१८/१०/१९९४
  ३. आयकर अधिनियम १९६१ नुसार १२अ व ८०G नोंदणीकृत, संस्थेला मिळणारी देणगी करपात्र
  ४. FCRA अन्वये नोंदणीकृत
- संस्थेचा नोंदणीकृत पत्ता :- समर्थ अपार्टमेंट, २८३५, बी -२०३, साटवली रोड –लांजा , मु.पो. लांजा, ता.लांजा, जि.रत्नागिरी – ४१६७०१
- मुख्य प्रकल्प कार्यालय :- जावडे – नामयेवाडीजवळ , मु.पो.जावडे, ता.लांजा, जि.रत्नागिरी, महाराष्ट्र
- संपर्क नं :- ९३७३३४६२१३ , ८४१२०११८०६ heritagekonkan@gmail.com

www.heritagekonkan.org.in

- दर्पण आय डी :- MH/2017/0164348
- संस्था अध्यक्ष :- ॲड. अपर्णा अनंत पवार , मोबा. ७६६६०४७७३३
- मालमत्ता :- जावडे , ता.लांजा , जि.रत्नागिरी येथे तीन एकर जमीन

**संस्थेच्या कामाचे मुख्य कार्यक्षेत्र :-** शिक्षण , सार्वजनिक आरोग्य , सबलीकरण – सक्षमीकरण , निरंतर जीवनाधार (उपजीविका) , लिंगसमभाव (स्त्री-पुरुष समानता), पर्यावरण

**प्रमुख सेवा :-**
संघटन, प्रबोधन, माहिती शिक्षण संवाद, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन-क्षमता बांधणी व जनजागृती, प्राथमिक सर्व्हेक्षण, प्रशिक्षण आखणी , संघटन बांधणी , समुपदेशन , गृहभेटी , सुलभीकरण, PRA , नियोजन, DPR , कायदेविषयक सल्ला व सहाय्य, मदत व पुनर्वसन, रोजगारविषयक मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, निवासी प्रशिक्षण केंद्र.

**शाळा -** न्यू इंग्लिश स्कूल जावडे , ता.लांजा, जि.रत्नागिरी (इयत्ता ८ वी ते १० वी )
प्राथमिक आश्रमशाळा जावडे , ता.लांजा , जि.रत्नागिरी (इयत्ता पहिली ते चौथी) निवासी शाळा
माध्यमिक आश्रमशाळा जावडे , ता.लांजा, जि.रत्नागिरी (इयत्ता ५ वी ते १० वी ) निवासी शाळा

**हाताळलेले उपक्रम :-**

- स्वयंसहाय्यता गटांची स्थापना व संगोपन (तीनशेहून अधिक गटांची स्थापना व त्यातील साडे तीन हजार महिलांचे आर्थिक सक्षमीकरण)
- स्वयंसहाय्यता गटांची क्षमता बांधणी
- १०० स्वयंसहाय्यता गटांकडून व्यवसायांची उभारणी
- अक्षय प्रकल्पांतर्गत क्षयरोगाबाबत जाणीव जागृती
- व्यसनमुक्ती प्रचार व प्रसाराचे काम
- जैव विविधता कायदा २००२ प्रसार – प्रचार , ३० जैव विविधता व्यवस्थापन समित्यांची स्थापना
- कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण अधिनियम २००५ प्रचार प्रसार प्रकल्पांतर्गत महिलांना सेवा देणे महिला व पुरुषांचे आधार गट उभारणी - ६० गावांमध्ये काम
- पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत निवड झालेल्या रत्नागिरी व ठाणे जिल्ह्यातील ४० गावांचा पीआरए
- एकात्मिक पाणलोट कार्यक्रमांतर्गत (IWMP) प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) म्हणून काम
- एकात्मिक पाणलोट कार्यक्रमांतर्गत (IWMP) जिल्हा संसाधन संस्था (DRO) म्हणून काम
- जलयुक्त शिवार अभियानांतर्गत गाव पातळीवरील प्रतिनिधींना प्रशिक्षण
- एकात्मिक पाणलोट कार्यक्रमांतर्गत (IWMP) जिल्हा संसाधन संस्था म्हणून Exit Protocol प्रशिक्षणाचे काम
- जल जीवन मिशन (JJM) अतर्गत अंमलबजावणी सहाय्य संस्था

**संस्थेला मिळालेले पुरस्कार :-**

१. व्यसनमुक्ती प्रचार व प्रसाराच्या कामाकरिता शासनाचा पुरस्कार
२. स्वयंसहाय्यता गट बांधणी व संगोपनाच्या उत्कृष्ट कामासाठी पुरस्कार
३. संस्थेकडून स्थापित स्वयंसहाय्यता गटांना शासनाकडून पुरस्कार

**संस्थेचे नियोजित उपक्रम :-** कौशल्य प्रशिक्षण केंद्र, स्पर्धा परीक्षा निवासी अभ्यास केंद्र , उच्च माध्यमिक आश्रमशाळा (ज्युनिअर कॉलेज), आर्किटेक्चर कॉलेज , सीबीएसई बोर्ड इंग्रजी माध्यमाची निवासी शाळा , पब्लिक स्कूल , व्यसनमुक्ती केंद्र,